**(कुलगुरू कार्यालय)**

जा.क्र.: कबचौउमवि/1/निवडणूक अपील/67/2023 दि : 08/03/2023

प्रति,
**श्री. विष्णू रामदास भंगाळे,**
330, ओंकार नगर,
जळगाव
(vishnubhangale9999@gmail.com)

**विषय : विद्यापीठ प्राधिकरण निवडणूक-2022**
**व्य.प.सदस्य निवडणुकीतील उमेदवार अमोल नाना पाटील यांचा उमेदवारी अर्ज वैध ठरविल्याबाबत आपल्या तक्रार (अपील) अर्जावरील निर्णय....**

**संदर्भ : 1) आपला दि.08/03/2023 रोजी ई-मेल व्दारा प्राप्त तक्रार(अपील) अर्ज**
**2) कुलगुरू कार्यालयाकडील दि. 08/03/2023 रोजीचा ई-मेल**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेच्या सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी दि.16/03/2023 रोजी अधिसभेच्या बैठकीमध्ये होणाऱ्या निवडणूकीच्या अनुषंगाने आपण अधिसभेच्या नोंदणीकृत पदवीधर सदस्यांमधून खुला प्रवर्गातील अमोल नाना पाटील यांचा नामांकन अर्ज वैध ठरविल्याबाबत संदर्भांकित तक्रार (अपील) अर्ज सादर केला आहे.

यासंदर्भात एकरुप परिनियम 01/2017 मधील नियम क्र.10(7) नुसार आपले म्हणणे सादर करण्यासाठी आज दि.08/03/2023 रोजी दुपारी 04.30 वाजता आपल्या संदर्भांकित तक्रार(अपील) अर्जावरील सुनावणी कुलगुरु यांचेकडे आयोजित करण्यात आली व आपणास तसा ई-मेल देखील पाठविण्यात आला आणि तसे दूरध्वनीव्दारे आपणास कळविण्यात आले.

सदरहू सुनावणीस आपण प्रत्यक्ष उपस्थित राहून आपले म्हणणे मांडलेले आहे. शिवाय आपल्या उपरोक्त संदर्भांकित तक्रार(अपील) अर्जात नमूद केलेले मुद्दे व आज रोजी सादर केलेले आपले म्हणणे ऐकुन घेण्यात आले आहे. यासंदर्भात आपणास पूरेपुर संधी दिलेली आहे. तसेच आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करुन नियमांचे अवलोकन करण्यात आलेले आहे.

सबब, आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील कलम 30(4)(i) नुसार अधिसभेच्या नोंदणीकृत पदवीधर सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या प्रतिनिधींसाठी तयार करण्यात आलेल्या नामांकन अर्जाच्या (Nomination Form) विहीत नमुन्यात भाग-अ (Part-A) मध्ये उमेदवाराने कोणत्या प्राधिकरणासाठी निवडणूक लढवायची आहे त्याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे उमेदवार कोणत्या मतदारांच्या गटामधून (Constituency) व कोणत्या प्रवर्गातून (खुला / आरक्षित) मधून निवडणूक लढविणार आहे याचा स्पष्ट उल्लेख आहे. संबंधित उमेदवार अमोल नाना पाटील यांच्या नामांकन अर्जातील PART-A मध्ये Name of the Constituency समोर Registered Graduates as per Section 30(4)(i) असे नमूद आहे. त्याचप्रमाणे Part-D (Declaration by the Candidate) मध्ये सुरुवातीलाच उमेदवारास नामांकन मान्य आहे, असे नमूद आहे.

या कार्यालयास प्राप्त माहितीनुसार आपल्या वरील आक्षेपाबाबत निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव यांनी दि.06/03/2023 रोजी उमेदवारी अर्जांच्या छाननीच्या वेळी त्यांचा निर्णय त्याचवेळी जाहीर केला होता. छाननी प्रक्रीये दरम्यान आक्षेप अर्जावर निर्णय घेण्याची कोणतीही तरतूद नाही. तरी देखील आपला अर्ज प्राप्त झाल्यावर त्यासंदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव यांनी आपणास त्याच दिवशी लेखी उत्तर दिलेले आहे.

...2

तसेच अधिसूचना 73/2023, दि.20/02/2023 मधील महत्वाच्या सूचनांमधील सूचना क्र. 6 मध्ये नमूद केल्याप्रमाणे Valid/Invalid declaration झाल्यानंतर आपले प्राप्त झालेले तक्रार अर्ज (अपील), अपीलकर्त्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर केलेले मुद्दे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव यांनी केलेली कार्यवाही इत्यादी संपूर्ण बाबी विचारात घेता आपले उपरोक्त संदर्भिय तक्रार(अपील) अमान्य करण्यात येत आहे.

वरील निर्णय एकरुप परिनियम क्र.1/2017 मधील 10(7) या नियमानुसार घेतला असून हा निर्णय अंतिम आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

8/3/23

**(प्रा. वि. ल. माहेश्वरी)**
कुलगुरू 6.20pm

**प्रत :** कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१
KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001

(कुलगुरू कार्यालय)

जा.क्र.: कबचौउमवि/1/निवडणूक अपील/68/2023 दि : 08/03/2023

प्रति,
**प्रा. एकनाथ गोपाळ नेहेते,**
भुसावळ कला, विज्ञान आणि पी.ओ.नाहटा वाणिज्य महाविद्यालय,
भुसावळ, जि. जळगाव
(egnehete@gmail.com)

**विषय : विद्यापीठ प्राधिकरण निवडणूक-2022**
**व्य.प.सदस्य निवडणुकीतील उमेदवार प्रा. शिवाजी बन्सीलाल पाटील यांचा उमेदवारी अर्ज वैध ठरविल्याबाबत आपल्या तक्रार (अपील) अर्जावरील निर्णय....**

**संदर्भ : 1) आपला दि.08/03/2023 रोजी प्र-कुलगुरू यांच्या भ्रमणध्वनीवर व्हॉटस् ॲपव्दारा पाठविलेला तक्रार(अपील) अर्ज**
**2) कुलगुरू कार्यालयाकडील दि. 08/03/2023 रोजीचा ई-मेल**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेच्या सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी दि.16/03/2023 रोजी अधिसभेच्या बैठकीमध्ये होणाऱ्या निवडणूकीच्या अनुषंगाने आपण अधिसभेच्या शिक्षक सदस्यांमधून खुला प्रवर्गातील शिवाजी बन्सीलाल पाटील यांचा नामांकन अर्ज वैध ठरविल्याबाबत संदर्भांकित तक्रार(अपील) अर्ज सादर केला आहे.

यासंदर्भात एकरुप परिनियम 01/2017 मधील नियम क्र. 10(7) नुसार आपले म्हणणे सादर करण्यासाठी आज दि.08/03/2023 रोजी दुपारी 04.30 वाजता आपल्या संदर्भांकित तक्रार(अपील) अर्जावरील सुनावणी कुलगुरू यांचेकडे आयोजित करण्यात आली व आपणास तसा ई-मेल देखील पाठविण्यात आला आणि तसे दूरध्वनीव्दारे आपणास कळविण्यात आले.

सदरहू सुनावणीस आपण प्रत्यक्ष उपस्थित राहून आपले म्हणणे मांडलेले आहे. शिवाय आपल्या उपरोक्त संदर्भांकित तक्रार(अपील) अर्जात नमूद केलेले मुद्दे व आज रोजी सादर केलेले आपले म्हणणे ऐकुन घेण्यात आले आहे. यासंदर्भात आपणास पूरेपुर संधी दिलेली आहे. तसेच आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करुन नियमांचे अवलोकन करण्यात आलेले आहे.

सबब, आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील कलम 30(4)(g) नुसार अधिसभेच्या शिक्षक सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या प्रतिनिधींसाठी तयार करण्यात आलेल्या नामांकन अर्जाच्या (Nomination Form) विहीत नमुन्यात भाग-अ (Part-A) मध्ये उमेदवाराने कोणत्या प्राधिकरणासाठी निवडणूक लढवायची आहे त्याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे उमेदवार कोणत्या मतदारांच्या गटामधून (Constituency) व कोणत्या प्रवर्गातून (खुला / आरक्षित) मधून निवडणूक लढविणार आहे याचा स्पष्ट उल्लेख आहे. संबंधित उमेदवार शिवाजी बन्सीलाल पाटील यांच्या नामांकन अर्जातील PART-A मध्ये Name of the Constituency समोर Teachers as per Section 30(4)(g) असे नमूद आहे. त्याचप्रमाणे Part-D (Declaration by the Candidate) मध्ये सुरुवातीलाच उमेदवारास नामांकन मान्य आहे, असे नमूद आहे.

या कार्यालयास प्राप्त माहितीनुसार आपल्या वरील आक्षेपाबाबत निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव यांनी दि.06/03/2023 रोजी उमेदवारी अर्जांच्या छाननीच्या वेळी त्यांचा निर्णय त्याचवेळी जाहीर केला होता. छाननी प्रक्रीये दरम्यान आक्षेप अर्जावर निर्णय घेण्याची कोणतीही तरतूद नाही. तरी देखील आपला अर्ज प्राप्त झाल्यावर त्यासंदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव यांनी आपणास त्याच दिवशी लेखी उत्तर दिलेले आहे.

...2

आपल्या उपरोक्त संदर्भिय तक्रार(अपील) अर्जातील महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील कलम 64(e) या मुद्याच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाकडे उपलब्ध कागदपत्रांवरुन सदरहू कलम शिवाजी बन्सीलाल पाटील यांना लागु केल्याचे दिसून येत नाही.

तसेच अधिसूचना 73/2023, दि.20/02/2023 मधील महत्वाच्या सूचनांमधील सूचना क्र. 6 मध्ये नमूद केल्याप्रमाणे Valid/Invalid declaration झाल्यानंतर आपले प्राप्त झालेला तक्रार अर्ज (अपील), अपीलकर्त्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर केलेले मुद्दे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव यांनी केलेली कार्यवाही इत्यादी संपूर्ण बाबी विचारात घेता आपले उपरोक्त संदर्भिय तक्रार(अपील) अमान्य करण्यात येत आहे.

वरील निर्णय एकरुप परिनियम क्र.1/2017 मधील 10(7) या नियमानुसार घेतला असून हा निर्णय अंतिम आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

V.Maheshwari
8/3/23

**(प्रा. वि. ल. माहेश्वरी)**
कुलगुरू 6.25 pm

**प्रत :** कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.